India Media Monitor

# Aaple Mahanagar

## Doctors unique movement

**Date: 28/08/2013 | Edition: Mumbai | Page: 9 | Source: Bureau | Clip size (cm): W: 17 H: 9**

**Clip: 1 of 1**

# डॉक्टरांचे अनोखे आंदोलन

मुंबई । प्रतिनिधी

जवळपास ३०० हून अधिक मेडिकलच्या विद्यार्थ्यांनी आयएमए हाऊसकडे एकत्र जमून पुन्हा एकदा केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला अंडर ग्रॅज्युएट (यूजी) आणि पोस्ट ग्रॅज्युएट (पीजी) मेडिकल सीट्सची संख्या समान करण्याची मागणी केली. मेडिकलच्या विद्यार्थ्यांनी 'सेव्ह द डॉक्टर' ही चळवळ एकाच दिवशी बंगळुरू, जयपूर, हैद्राबाद, म्हैसूर, गोहत्ती आणि हिस्सार या शहरांमध्येही हाती घेतली. नेहमीचा लॅब कोट घालून काळ्या फिती लावलेल्या या विद्यार्थ्यांनी एका भव्य कॅन्व्हासवर आपले हाताचे ठसे उमटवले. देशामध्ये स्पेशालिस्ट डॉक्टरांच्या टंचाईकडे लक्ष वेधण्यासाठी हे सूचन करण्यात आलं. या विद्यार्थ्यांनी जमिनीवर 'सेव्ह द डॉक्टर' असा संदेश देऊन त्यातलं प्रत्येक अक्षर मेणबत्तीने उजळवलं. या चळवळीबद्दल बोलताना 'मेदांत'चे सीएमडी डॉ. नरेश त्रिहान म्हणाले,

'आपल्या देशातल्या मेडिकलच्या विद्यार्थ्यांच्या परिस्थितीबद्दल मला चिंता वाटतेय. आपणा सर्वांनाच माहीत आहे की पदवी घेऊन बाहेर पडणारे विद्यार्थी आणि पीजी सीट्स यांचं प्रमाण व्यस्त आहे. आज पीजी सीट मिळण्यासाठी विद्यार्थ्यांना खूप संघर्ष करावा लागतोय. ही परिस्थिती बदलण्यासाठी आपल्याला लवकरात लवकर पावलं उचलली पाहिजेत कारण आपल्या देशाला अधिकाधिक स्पेशालिस्टची आवश्यकता आहे.'

ते पुढे म्हणाले की, स्पेशालिस्टची अपॉइण्टमेण्ट मिळणं किती मुश्कील असतं हे आपण जाणतोच. मग गायनॅकोलॉजिस्ट असो, ऑर्थोपिडिक असो वा इतर कोणी, ही फार मोठी समस्या बनत चालली आहे. याचं कारण म्हणजे कोट्यवधी लोकांना सेवा देण्यासाठी उपलब्ध असलेल्या स्पेशालिस्टची संख्या पुरेशी नाही. आम्ही आरोग्यखात्याला आणि संबंधित अधिकाऱ्यांना तसं लेखी आवाहन दिलं आहे. त्यावर आम्हाला सकारात्मक प्रतिसादही मिळाला आहे. आम्हला विश्वास आहे की लवकरच यावर तोडगा निघेल.